# स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) योजना माहिती

**शासन परिपत्रक क्रमांक : स्वभामि-2014/प्र.क्र.27/पापु-08 दि. 7 नोव्हेंबर, 2014**
**स्वभामि-2014/प्र.क्र.27/पापु-08 दि. 10 नोव्हेंबर, 2014**

---

केंद्र व राज्यस्तरावर राबविण्यांत येत असलेल्या निर्मल भारत अभियानाचे नामकरण दि. 2 ऑक्टोबर, 2014 पासून स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) असे करण्यात आले आहे. भारताचे पंतप्रधान यांनी दिनांक 2 ऑक्टोबर, 2014 रोजी हे मिशन अंमलात आणले आहे. गावपातळीवर हे मिशन राबविताना पुढील कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येतो.

1. ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत स्तरावर शौचालय नसलेल्या व अनुदानास पात्र असलेल्या लाभधारकांची यादी खात्री करुन प्रसिद्ध करावी.
2. लाभधारकांनी यापूर्वी शौचालय अनुदानाचा लाभ घेतेला नसल्याची खातरजमा ग्रामपंचायतीकडून करण्यांत यावी.
3. लाभधारकाने शौचालय बांधकामास परवानगी मिळणेबाबतचा अर्ज ग्रामपंचायतीकडे सादर करावा. (ग्रामपंचायतीने अर्ज प्राप्त करुन घ्यावा.)
4. ग्रामपंचायतीने सदरचे अर्ज ग्रामपंचायत सभेत घेऊन मंजूरी देण्याबाबत कार्यवाही करावी. कार्यवाही करताना खालील बाबींची दक्षता घ्यावी.
   - अ) शौचालय बांधकामाबाबतची जागा लाभधारकाची स्वत:ची असावी किंवा त्यांनी स्वत: उपलब्ध करणे आवश्यक आहे.
   - आ) शौचालय बांधकामामुळे आजूबाजूच्या परिसरात अथवा शेजा-यांना किंवा इतरांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.
   - इ) पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून शौचालय सुरक्षित अंतरावर बांधण्यात येईल याची दक्षता घ्यावी.
5. पात्र लाभधारकांना बांधकामाच्या जागेची आखणी करुन देणे व तांत्रिक मार्गदर्शन करणे ही जबाबदारी उपअभियंता बांधकाम यांनी पार पाडावी.
6. बांधकाम पूर्ण झालेनंतर लाभधारकाने प्रोत्साहन अनुदान मिळण्याकरिता अर्ज गट विकास अधिकारी यांचे नावाने ग्रामपंचायत मार्फत सादर करावा. अर्जावर लाभधारकाचा बँक खाते क्रमांक व बँकेचे नाव नमूद करावे. सदरचा अर्ज ग्रामपंचायतीने दोन दिवसांत खात्री करुन गट विकास अधिकारी यांच्याकडे सादर करावा.
7. ग्रामपंचायतीच्या सरपंच व ग्रामसेवक यांनी शौचालय पूर्णत्वाची व वापराची खात्री करुन तशी शिफारस दयावी. तसेच कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांनी शौचालय बांधकाम तांत्रिकदृष्टया पूर्ण झाले असल्याची खात्री करुन अनुदानास पात्र असल्याची शिफारस दयावी.

8. जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेले अनुदान गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायतीमार्फत रेखांकित धनादेशाद्वारे (क्रॉस चेकद्वारे) लाभार्थ्यांना अदा करण्यांत यावे.

*** वैयक्तिक शौचालयाच्या (IHHL) बांधकामासाठी प्रोत्साहनपर रक्कम रु. 12,000/- (अक्षरी रु. बारा हजार मात्र) ठरविण्यात आली असून त्यामध्ये पाणी उपलब्धता, पाणी साठवण, हात धुणे व शौचालय स्वच्छता या बाबींचा समावेश करण्यात आला आहे.**